# अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि जमाती आयोगाचे विभाजन केल्यानंतर सरकारने अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा दिला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे आयोगाला अर्धन्यायिक स्वरूपाचे अधिकार मिळून आयोगाच्या कामकाजाला गती येणार आहे.

सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात सन २००५ मध्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. केंद्र सरकारमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग कार्यरत आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याशी निगडीत विषय वेगवेगळे असल्याने या दोन्हींसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची शिफारस केंद्रीय जनजाती परिषदेने केली आहे. त्यानुसार राज्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा निर्णय ३ जून २०२५ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता.

कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या विधेयकाच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच या आयोगासाठी निर्माण केलेल्या २७ पदांना आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली. सध्या आयोगाकडे जवळपास १ हजार ४०० च्या आसपास विविध प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा निपटारा करण्यास आयोगाला आता मदत होणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ, बी.एस्सी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनाही मिळणार विद्यावेतन

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील शासकीय भौतिकोपचार (फिजीओथेरपी), व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल थेरपी) पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात सहा हजाराहून अधिक रकमेची वाढ करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ही वाढ १ जून २०२५ अशी पूर्वलक्षी प्रभावापासून लागू होणार आहे. याशिवाय बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन सुरू करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे.

शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता प्रशिक्षण काळात दरमहा १ हजार ७५० रुपये विद्यावेतन मिळत होते. यामध्ये ६ हजार २५० रूपयांची वाढ करून त्यांना आता दरमहा ८ हजार रूपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तर याच अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना महागाई भत्त्यासह १० हजार रूपये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वाढीनंतर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३ हजार ७३० रूपये इतके विद्यावेतन मिळणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड या पाच ठिकाणी शासकीय परिचर्या महाविद्यालयात बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरू आहे. या प्रत्येकी ठिकाणी ५० विद्यार्थी शिकतात. या विद्यार्थ्यांचा आंतरवासिता कालावधी सहा महिन्यांचा असतो. या विद्यार्थ्यांना दरमहा आठ हजार रूपये विद्यावेतन देण्यास मंत्रिमंडळाने काल मान्यता दिली.

## पान १ वरुन

## मनपासह पालिका, नगरपंचायतींसाठी...

निवडणुकीसाठी पूर्वीप्रमाणेच म्हणजे २२७ वॉर्ड कायम ठेवण्यात आले आहेत. तर अहिल्यानगर, नाशिकसह अ, ब, क, ड वर्ग महापालिका क्षेत्रात चार सदस्यीय प्रभागरचना करण्यात येणार आहे. त्यानुसार मुंबईसह अ, ब आणि क महापालिका क्षेत्रातील प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी संबंधित आयुक्तांवर तर ड महानगर पालिकेतील प्रभाग रचनेची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

इतर मागास वर्गाच्या ( ओबीसी) राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच दिले आहेत. त्यानुसार स्थानिक निवडणुकांसाठी राज्य सरकार कामाला लागले आहे. या प्रभाग रचनेसाठी साधारण अडीच महिन्यांचा कालावधी लागणार असून यासाठी गुगल मॅपचा आधार घेण्यास सांगण्यात आले आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या ८ सप्टेंबर २०२२ च्या अधिनयमानुसार मुंबई वगळता अ, ब आणि क महापालिकेत चार सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. या महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत वा पाचपेक्षा अधिक नाहीत, एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे. या महापालिकांमध्ये नाशिकसह ठाणे,पुणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण-डोंबिवली यांचा समावेश आहे.

मुंबई महापालिकेसाठी ८ सप्टेंबर २०२२च्या अधिनियमानुसार २२७ प्रभागांनुसार प्रभाग रचना प्रारूप करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. प्रभाग रचना करताना महापालिका क्षेत्राची माहिती असणारा अधिकारी, प्रभाग रचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी, नगर रचनाकार, संगणकतज्ज्ञ यांची महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे आधिकार देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्तांनी प्रारूप प्रभाग रचना तयार करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेस सादर करायची आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्रभाग रचनेस मान्यता देण्यात येणार आहे. ही मान्यता मिळाल्यानंतर महापालिका आयुक्तांकडून प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर हरकती आणि सूचना मागविण्यात येणार आहेत. हरकती आणि सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यावर सुनावणी घेऊन निवडणूक आयोगाकडून अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देण्यात येणार आहे. त्यानंतर ही अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करेपर्यंत ही प्रभाग रचना गुप्त ठेवण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहे. या प्रक्रियेस कोणतीही निश्चित कालमर्यादा देण्यात आली नसली तरी साधारणतः अडीच ते तीन महिन्यात ही प्रभाग रचना पूर्ण होणे अपेक्षित आहे.

नगर विकास विभागाने नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेचे आदेशही निर्गमित केले आहेत. २५ जानेवारी २०२२च्या अधिनियमानुसार ही प्रभाग रचना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही प्रभागरचना करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

## नगरमध्ये होणार चार सदस्यीय प्रभागरचना

रचना करताना महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या भागिले महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या गुणिले संबंधित प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार एका प्रभागात समाविष्ट करावयाची सरासरी लोकसंख्या निश्चित केली जाणार आहे. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल.

प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात केली जाणार आहे. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकत प्रभाग रचनेचा शेवट महानगरपालिका क्षेत्राच्या दक्षिण दिशेला केला जाणार आहे. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने दिले जाणार आहेत.

## ५० टक्के लाडक्या बहिणींना तिकीट...

काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापनदिनाच्या मेळाव्यात ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार सुप्रिया सुळे, माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्यासह खासदार डॉ. अमोल कोल्हे, नीलेश लंके, आमदार जितेंद्र आव्हाड, रोहित पवार, रोहित पाटील, हर्षवर्धन पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील, शशिकांत शिंदे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, की महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासाचे ध्येय राष्ट्रवादी काँग्रेसने नेहमीच अग्रस्थानी ठेवले आहे. देशाच्या संरक्षणात महिलांना संधी मिळाल्याने जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. आगामी दोन-तीन महिन्यांत होणाऱ्या जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये महिलांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पक्षाने घेतला आहे. हा निर्णय यशस्वी करण्याची जबाबदारी आता कार्यकर्त्यांवर आहे.

पक्षात काही अंतर्गत मतभेद झाले आणि काही सदस्य पक्ष सोडून गेले असले तरी, उरलेले कार्यकर्ते विचारांशी एकनिष्ठ राहून जनतेच्या सुख-दुःखात साथ देतील, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. मकोण गेलेफ यावर चिंता न करता, विचार आणि जनतेची बांधिलकी हीच पक्षाची खरी ताकद आहे, असे पवार महाणले. त्यांनी १९८० सालच्या प्रसंगाची आठवण करून दिली. जेव्हा पक्षाकडे फक्त ६ आमदार शिल्लक राहिले होते, परंतु पुढील निवडणुकीत त्यांची संख्या ७२ पर्यंत पोहोचली आणि पुन्हा राज्य चालवण्याची संधी मिळाली. अहमदनगरच्या खासदारांचे उदाहरण देऊन, सामान्य कार्यकर्त्यांची निस्वार्थ सेवा, जसे की लहान घरात राहून रात्री उशिरापर्यंत लोकांना भेटणे आणि त्यांचे काम करणे, ही अतिशय मौल्यवान राष्ट्रसेवा असून ती अमूल्य असल्याचे म्हटले. तुमच्यासारखे कार्यकर्ते एक विचाराने एकत्र आले तर सत्ता येते, त्यामुळे विचारांची चिंता करू नका, असे आवाहन त्यांनी केले.

जयंतरावांनी संघटना मजबूत करण्याचे काम केले. पुढचे तीन महिने महिलांना प्रवाहात आणले जाईल. हाडांच्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल. कोण आले कोण गेले, याची चिंता करायची नाही. सत्ता येण्याची चिंता नको. येत्या निवडणुकीत चांगले चित्र पाहायला मिळेल, असा विश्वासही पवार यांनी यावेळी व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत एकत्र लढायचे की स्वतंत्रपणे सामोरे जायचे, याचा निर्णय जिल्हा नेतृत्वाशी चर्चा करूनच घेतला जाईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

**ही लढाई तुकाराम विरुद्ध नथुराम– जयंत पाटील**

जयंत पाटील म्हणाले, की आम्ही तुकाराम महाराज यांच्या विचारांचे आहोत. भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथी हाणू काठी, असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. ही लढाई तुकाराम विरुद्ध नथुराम आहे. त्यामुळे यापुढे रस्त्यावर उतरणार आमची भूमिका असल्याचा इशारा त्यांनी दिला. विरोधक पवार साहेबांवर टीका करत असतात. साहेबांच्या विरोधात बोलले जाते. त्यांना माहिती असते, की पवारांवर टीका केली की मूळ प्रश्न बाजूला राहतात. यातून दिसते, की 'अभी भी पवार साहब का डर बाकी है' असे सांगत पाटील यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. ओबीसी आरक्षण मुद्यावरून पवारांवर नाहक टीका केली जाते. ओबीसी हितासाठी साहेबांनी नेहमी प्रयत्न केले. देशात मंडल लागू करणारे पहिले मुख्यमंत्री पवारसाहेब होते, अशी आठवणही जयंत पाटील यांनी करून दिली.

## निवडणुकीत जिवाचं रान करा...

त्यांच्या मतानुसार निवडणुकीला सामोरे जाऊ असे स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार गट) २६ वा वर्धापन दिन सोहळा मंगळवारी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात साजरा झाला. सोहळ्याच्या समारोप प्रसंगी अजित पवार बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राष्ट्रीय कार्यध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, नवाब मलिक , खासदार सुनेत्रा पवार, प्रदेश सरचिटणीस व कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे, मंत्री आदिती तटकरे, आमदार चेतन तुपे, आण्णा बनसोडे, प्रमुख प्रवक्ते आनंद परांजपे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, धीरज शर्मा, सुरेश घुले, योगेश बहेल, राजलक्ष्मी भोसले, माजी आमदार सुनील टिंगरे, सुभाष जगताप, प्रदीप गाराटकर, माजी आमदार विलास लांडे, सुभाष जगताप, प्रदीप देशमुख, प्रमोद हिंदुराव यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

पवार म्हणाले, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २८ महापालिका, २५ जिल्हा परिषद, २८५ पंचायत समितीच्या तसेच नगरपालिका व नगरपरिषद यांच्या निवडणुका होत आहेत. यात पक्षाकडून तरुण तरुणींना तसेच महिलांना अधिकाधिक संधी दिली जाणार आहे. मुंबई मध्ये एकचा प्रभाग तर अन्यत्र ४ चा प्रभाग असणार आहे. आता काहींचे मतप्रवाह वेगळे असतील पण आहे ती प्रभाग परिस्थिती आपण स्वीकारली पाहिजे असेही ते म्हणाले. राज्यात नव्याने १ कोटी सदस्य नोंदणी चे उद्दिष्ट्य ठेवण्यात आले असून पुण्यात दहा लाख व अन्य मोठ्या जिल्ह्यात पाच लाख सदस्य या चार महिन्यात नोंदविण्यसाठी कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे. येणारा काळ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे. दरम्यान महायुती राज्यात सत्तेत आहे तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही असा शब्द पवार यांनी यावेळी दिला.

सुनील तटकरे यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीत आपल्याला अपेक्षित यश मिळाले नाही तेव्हा अजित पवार यांच्यावर टीका झाली पण मला विश्वास होता की विधानसभा निवडणुकीत यश मोठे मिळणार व ते मिळाले. आता गेली आठ वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत, त्यामुळे चार महिन्यानंतर येणाऱ्या या निवडणुकीला आपल्याला मोठ्या ताकदीने सामोरे जायचे आहे. विधानसभा निवडणुकीत आपल्याला मोठे यश मिळाले असून, आता एक नवीन ऊर्जा घेऊन आपल्याला काम करायचे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल लागेल तेव्हा महायुतीच्या नियमांना बाधा न आणता आपल्याला यश मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर म्हणाल्या, अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्हा महिलांना ताकद व आत्मविश्वास दिला असल्याचे सांगितले. यावेळी सिने अभिनेते सयाजी शिनेडे, माजी मंत्री संजय बनसोडे, नरहरी हिरवळ आदींची भाषणे झाली.

## दारू महागली

महसूल वाढविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने गृहनिर्माण विभागाच्या तत्कलीन अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी महिन्यात अभ्यासगट स्थापन केला होता. या गटाने मद्यनिर्मिती धोरण, लायसन्स, उत्पादन शुल्क तसेच कर संकलन वाढीसाठी इतर राज्यातील राबविण्यात येत असलेल्या पध्दतींचा, धोरणात्मक बाबींचा अभ्यास करुन राज्य सरकारला एप्रिल महिन्यात शिफारशी आणि अहवाल सादर केला. या अहवालाच्या आधारे राज्य मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत दारूच्या सुधारित विक्री दरात वाढ करण्यास मान्यता देण्यात आली.

भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या (आयएमएफएल) २६० रुपये प्रति बल्क लीटरपर्यंत निर्मितीमूल्य घोषित केलेल्या मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर निर्मिती मूल्याच्या ३ पट वरुन साडेचारपट करण्यात येणार आहे. देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर प्रति प्रुफ लीटर १८० रुपयांवरून २०५ रुपये करण्यात येणार आहे. महाराष्ट्र मेड लिकर (एमएमएल) हा धान्याधारित विदेशी मद्याचा नवीन प्रकार तयार करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामध्ये फक्त महाराष्ट्रातील मद्य उत्पादक असे उत्पादन करु शकतील. त्यांना या नव्या प्रकारातील उत्पादनाची (ब्रँड) नवीन नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. या उत्पादकांना त्यांचे उत्पादन राज्याबाहेर विकण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय मंत्रिमंडळाने उत्पादन शुल्क विभागाचा एकात्मिक नियंत्रण कक्ष उभारण्यासही मान्यता दिली. या कक्षाच्या माध्यमातून एआय प्रणालीद्वारे राज्यातील डिस्टिलरी, मद्य निर्माणी, घाऊक विक्रेते आदींचे नियंत्रण करण्यात येणार आहे.

## साहेबराव घाडगे पाटील यांचे निधन

क्षणार्धात सामाजिक- शैक्षणिक- राजकीय क्षेत्रातील मंडळींसह त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या शिक्षक, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

एका सर्वसामान्य गरीब कुंटूंबात जन्म झालेल्या साहेबराव घाडगे पाटील यांचा सुरूवातीचा काळ अतिशय कठिण परिस्थितीत गेला. अठराविश्व दारिद्र्य असलेल्या त्यांच्या कुंटुंबामधील नऊ व्यक्तीमध्ये सुरूवातीच्या काळामध्ये कमावते फक्त आईवडिल होते. एवढे मोठे कुटूंब चालवितांना आईवडिलांना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे साहेबराव घाडगे पाटील यांच्या दोन मोठ्या बंधूंना कुटुंबाला मदत व्हावी यासाठी इच्छा असूनही शिक्षण घेता आले नाही. याच काळामध्ये कुंटुंबाला मदत होईल यासाठी तेही स्वतः शेतीच्या कामामध्ये हातभार लावायचे. त्यांचे वडिल धार्मीक प्रवृत्तीचे होते, परंतु साहेबरावांना ते कायम म्हणत की नावाप्रमाणेच तू मला साहेब होऊन दाखव आणि त्यांनीही वडिल हयात असतानाच त्यांचे हे स्वप्न सत्यात उतरविले.

साहेबरावांमध्ये अफाट प्रतिभाशक्ती आणि शिक्षण घेण्याची जिद्द होती. त्यांनी जिद्द चिकाटी आणि सातत्य ही यशाची त्रिसुत्री अंगीकारली होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण तेलकुडगाव ता. नेवासा या त्यांच्या मुळ गावी तर माध्यमिक शिक्षण ढोरजळगाव ता. शेवगाव या ठिकाणी झाले. परतुं महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने कमवा आणि शिका या योजनेतून त्यांनी रा.ब.ना. बोरावके या महाविद्यालयातून बी.एस्सी पूर्ण केले. त्यानंतर अहमदनगर महाविद्यालयातून फिजीक्स इलेक्ट्रानिक्समधून एम.एस्सी. ही पदवी घेतली. महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी त्यांना महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे खुपच मदत झाली. पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी पवई येथे डी.आय. आय.टी. ही पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा ही पदवी घेतली.

शिक्षण पूर्ण झाल्यावर अनेक उच्च पदावर त्यांनी सेवा केली. यामध्ये सायन्स कॉलेज सातारा येथे अधिव्याख्याता म्हणून एक वर्ष, आय.ई.एस. केंद्रिय सेवा वर्ग १ मधुन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून दोन वर्षे, भारतीय सैन्यात मेजर म्हणून चार वर्षे, प्रवरा अभियात्रिंकी महाविद्यालयामध्ये प्र. प्राचार्य / अधिव्याख्याता म्हणून चार वर्षे, एसटी महामंडळामध्ये विभाग नियंत्रक म्हणून तीन वर्षे व बृहनमुंबई महानगरपालिकेमध्ये उप-आयुक्त / सह-आयुक्त म्हणून आठ वर्षे अशी १९७८ ते २००० या कालावधीमध्ये २२ वर्षे विविध उच्च पदावर सेवा केली. खेडेगावात जन्म होऊनही कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन नसताना अशा अनेक उच्च पदावर विराजमान होणे हे आजच्या तरूण पिढीसाठी एक मोठे आदर्श उदाहरणच होय.

त्यांनी सन १९९५ मध्ये त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठान या धर्मदाय संस्थेची स्थापना केली. यासाठी त्यांच्या धर्मपत्नी ॲड. सौ. सुमतीताई घाडगे पाटील यांनी खंबीर साथ दिली. यानंतर त्यांनी गावातील मुलांमुलींची शिक्षणासाठी हेळसांड होऊ नये म्हणून सर्वप्रथम तेलकुडगाव या त्यांच्या मुळ गावी वडिलांच्या नावाने माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्यांनतर त्यांनी श्रीरामपूर, त्रिमुर्तीनगर, शेवगाव, ढोरजळगाव, घोगरगाव, अ.नगर, विदर्भात वर्धा व धामनगावरेल्वे येथे सर्व सोई सुविधांयुक्त भव्य वसतीगृहयुक्त शैक्षणिक संकुलांची उभारणी केली. शैक्षणिक संकुले उभी करताना कोणत्याही प्रकारचा राजकिय वारसा नसल्यामुळे त्यांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागले. परतुं अशा परिस्थितीमध्ये न डगमगता जिद्दीने व स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर अद्ययावत ७. डी.एड., ४ बी.एड. १ एम.एड.. विधी महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय, एसएनडीटीचे महिला महाविद्यालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या एकूण १५ शाळांची नऊ शैक्षणिक संकुलांमध्ये उभारणी केली. आज सर्व शैक्षणिक संकुलामध्ये वसतीगृहातील १३००० व अपडाऊनचे ७००० असे किमान २०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तर एकूण २९५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

## बेलापुरात लाखोंचा गुटखा पकडला

पंपाशेजारील जागेत जावून पहाणी केली असता लाखो रुपयांचा गुटखा त्यांना मिळून आला. याप्रकरणी बेलापूर आऊट पोस्टच्या पोलिसांना माहीती देण्यात आल्यानंतर त्यांनी सदर ठिकाणी दाखल होऊन गुटखा ताब्यात घेतला. या घटनेसंबंधी अन्न व औषध प्रशासनास माहीती देण्यात आली होती.

याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते. गेल्या दोन महिन्यांपूर्वी तालुक्यातील उक्कलगाव परिसरात अशाच प्रकारे गुटखा विक्रीवर कारवाई करण्यात आली होती. त्यावेळीही लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला होता.

स्थानिक पोलिस व स्थानिक गुन्हा शाखेच्या आशीर्वादाने हा गुटका व्यावसाय गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. फक्त श्रीरामपूर नव्हे तर संगमनेर, राहाता, राहुरी, नेवासा सह अनेक ठिकाणी याठिकाणाहून गुटका पुरविला जातो. जिल्ह्यातील गुन्हेगारीची सखोल माहिती असलेले सोमनाथ घार्गे यांनी पोलिस अधिक्षकपदाचा पदभार घेताच या अवैध धंद्यांवर कारवाईचा धडका सुरु केला आहे.

या गुटखा व्यावसायिकाने या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मालमत्ता मिळविली असून एक पेट्रोल पंपही विकत घेतला आहे. अवैध मार्गाने कमविलेली मालमत्ता सील करण्याचा किंवा ती ताब्यात घेण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. त्यामुळे या कारवाईत पोलिस किती कठोर कारवाई करतात याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## चितळीचा ज्योती साळुंके...

वडील नानासाहेब अनर्थे (रा. चंद्रापूर, ता. राहाता) यांनी संपूर्ण प्रकरणाची माहिती पत्रकारांपुढे मांडली. ज्योती यांचा विवाह २०१७ मध्ये मोहित साळुंके यांच्याशी झाला. सुरूवातीच्या काही महिन्यांत संसार सुरळीत होता. मात्र, नंतर सासरच्यांनी पाच लाख रूपये हुंड्याची मागणी करत तिचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. वडिलांनी अडीच लाख रूपये देऊनही छळ थांबला नाही. अखेर, २० जून २०२१ रोजी ज्योतीचा संशयास्पद मृत्यू झाला. पोलिसांनी तिच्या पतीसह सासरच्या तीन सदस्यांविरोधात छळ व आत्महत्येस प्रवृत्त करण्याचे गुन्हा श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात नोंदवले. मात्र, ही आत्महत्या नसून तिची अमानुष पध्दतीने हत्या करण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. देसाई यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ज्योतीला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही लढा सुरू ठेवू. महिला अत्याचाराच्या प्रकरणात निष्पक्ष तपास होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी.

**शवविच्छेदन अहवालात तफावत**

या प्रकरणात श्रीरामपूर येथील सरकारी रूग्णालयातील तात्कालीन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन अहवालात तफावत दाखवून महत्त्वाचे पुरावे नष्ट केल्याचा आरोप करण्यात आला. तपास करताना पोलिसांनी अनेक महत्त्वाचे पुरावे दुर्लक्षित केले किंवा नष्ट केले, त्यामुळे संशयित आरोपी मुक्त फिरत आहेत. इतकेच नव्हे तर, मृत ज्योतीचा मुलगा शिवांश याला देखील जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची गंभीर माहितीही यावेळी देण्यात आली.

**एसपींचा आश्वासक प्रतिसाद**

या गंभीर आरोपांची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रकरणाचा पुनर्तपास करून १५ दिवसांत चौकशीचा अहवाल सादर केला जाईल, त्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त केला जाईल, असे आश्वासन दिले. वैद्यकीय अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही गुन्हा दाखल केला जाईल. तसेच दोषी पोलिसांवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन अधीक्षक घार्गे यांनी पीडित कुटुंबाला दिले असल्याचे देसाई यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**महिला आयोगाची अध्यक्षा पक्षनिरपेक्ष असावी– देसाई**

राज्यात महिलांवर अत्याचार, हुंडाबळीच्या घटना वाढत असताना महिला आयोग निष्क्रिय असल्याची टीका तृप्ती देसाई यांनी केली. महिला आयोगाची अध्यक्षा ही कोणत्याही राजकीय पक्षाची पदाधिकारी नसावी, तर २४ तास काम करणारी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या जाणणारी असावी, अशी मागणी त्यांनी केली. राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनी महिला आयोगाने सुट्टी घेतल्याचे पाहून आयोगाची कार्यपध्दतीच प्रश्नात येते. त्यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत पक्षनिरपेक्ष नेतृत्वाची गरज अधोरेखित केली.

## बडतर्फ पोलिस अधिकारी...

महिलेने अत्याचाराचा आरोप करत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पीडित महिलेने जबाब देण्यापूर्वीच तिला आणि तिच्या दोन मुलींना धमकवण्यासाठी लोखंडे ७ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी तिच्या घरी पोहोचला. त्याने त्याच्या जवळील रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून दहशत निर्माण केली व त्यांना ओलीस ठेवण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी तत्कालीन उपअधीक्षक संदीप मिटके, स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अनिल कटके व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा लोखंडेने हवेत गोळी झाडून दहशत निर्माण केली. पोलीस पथक पीडितेच्या मुलींना सुरक्षितपणे बाहेर काढत असताना उपअधीक्षक मिटके व लोखंडे यांच्यात झटापट झाली व लोखंडेने गोळी झाडली. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नव्हती.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. दरम्यान, या गुन्ह्यात अटकेत असलेला व सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या लोखंडे याला उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या सहा दिवसांपासून त्याच्यावर उपचार सुरू होते. त्याच्या बंदोबस्तासाठी येथील पोलीस मुख्यालयातील दोन अंमलदारांची नियुक्त करण्यात आलेली होती. त्या पोलीस अंमलदारांना गुंगारा देऊन त्याने पळ काढला. त्यामुळे प्रशासनाची धावपळ उडाली असून, त्याचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, यासंदर्भात लोखंडे विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात मंगळवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार संजु वाघमारे यांनी फिर्याद दिली आहे. भारतीय न्याय संहिता कलम २६२ प्रमाणे (एखाद्या व्यक्तीने आपल्या कायदेशीर अटकेला प्रतिकार किंवा अटकाव करणे) गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

**पुणे पोलीस दलातून बडतर्फ**

सुनील लोखंडे हा पुणे ग्रामीण पोलीस दलात कार्यरत असताना त्याच्याविरूध्द शिरूर पोलीस ठाण्यात दोन खंडणीचे गुन्हे दाखल झाले होते. एका गुन्ह्यात त्याला पाच वर्ष शिक्षा देखील ठोठावण्यात आली आहे. त्यानंतर त्याला पोलीस खात्यातून बडतर्फ करण्यात आले होते. दरम्यान, लोखंडे विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात अत्याचारा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात त्याने पीडितेला धमकावताना उपअधीक्षक मिटके यांच्यावर गोळीबार केला होता. या गोळीबारानंतर देखील लोखंडी विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**दोन पोलिस कर्मचारी निलंबित**

पोलीस मुख्यालयातील अंमलदार संजू किसन वाघमारे व योगेश यशवंत दायजे या दोघांना लोखंडे उपचार घेत असलेल्या ठिकाणी बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या हलगर्जीपणामुळे लोखंडे पसार झाला आहे. त्या दोघांना निलंबित करण्यात आले असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

## ९ पोलीस ठाण्यांना नवीन प्रभारी

दरम्यान, नाशिक परिक्षेत्रातील बदल्यांचे आदेश महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी काढल्यानंतर जिल्ह्यातंर्गत बदल्याची उत्सुकता होती. मंगळवारी अधीक्षक घार्गे यांनी नऊ पोलीस ठाण्याला नवीन प्रभारी अधिकारी दिले आहेत. पाथर्डी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संतोष मुटकुळे यांची शेवगाव ठाण्याच्या प्रभारीपदी बदली केली तर घारगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास पुजारी यांना पाथर्डी ठाण्याचे प्रभारी केले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांना घारगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी करण्यात आले आहे. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांची बदली जामखेड पोलीस ठाण्याचे प्रभारीपदी करण्यात आली असून श्रीरामपूर तालुक्याला नियंत्रण कक्षातील अरूण धनवडे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक सोपान शिरसाठ यांना कर्जत तर रामकृष्ण कुंभार यांना कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी करण्यात आले आहे. खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांची बदली मिरजगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून तोफखाना पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपुत यांना खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी करण्यात आले आहे.

दरम्यान, जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.